सोनेरी क्षण

मुंबईजवळील वसई परिसरातील एक मध्यमवर्गीय कुटुंबात २२ एप्रिल १९२९ रोजी उषा किरण हिचा जन्म झाला. मूळ मराठी भाषक असूनही तिने अभिनयात पदार्पण केलं ते गुजराती चित्रपटातून. पतीता, नझराना, दिल भी तेरा हम भी तेरे, औलाद, धाबी डॉक्टर, काबुलीवाला, मदहोश, दाग, दोस्तसारख्या अनेक हिट हिंदी चित्रपटात उषा किरणने अभिनेत्री म्हणून दर्शकांची वाहवा मिळवली. डॉ.मनोहर खेर या सुस्वभावी पतीबरोबर उषा किरणने सुखी वैवाहिक जीवन अनुभवलं. सध्याच्या हिंदी चित्रपटक्षेत्रातली नावाजलेली अभिनेत्री तन्वी आझमी उषा किरणची कन्या. उषा किरण या प्रतिभावंत अभिनेत्रीने एक वर्ष मुंबईचं शेरीफपदही भूषवलं होतं. ढोला मारू या गाजलेल्या गुजराती चित्रपटातली तिची ही देखणी छबी!



छाया: कांती टक्कर

उषा किरण